# थोडक्यात पण महत्वाचे

## धोंडीराम मगर यांचे निधन



वैजापूर (स. गांवकरी) : तलवाडा (ता-वैजापुर) येथील धोंडीराम आबाराव मगर यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले नागवाडी परिसरातील मगरवस्ती येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी राजकिय धार्मिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पाश्चात भाऊ,दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार असून वैजापुर पंचायत समितीचे माजी उपसभापती राजेंद्र मगर यांचे ते वडील होते.

## 'मंथन' सामान्य ज्ञान परीक्षेत ऋग्वेद कारंजकर श्रीगोंदा तालुक्यात प्रथम

श्रीगोंदा (स. गांवकरी) : फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'मंथन' सामान्य ज्ञान परीक्षेत श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी ऋग्वेद अरंजकर याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने ३०० पैकी २२० गुण मिळवत श्रीगोंदा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत ३५ वा क्रमांक मिळवला आहे. ऋग्वेद हा येथील ज्येष्ठ नागरिक श्री सुनील कारंजकर यांचा नातू असून, शिरगाव (जि. पुणे) येथील आदर्श प्रकाश देवळे माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले साकेत कारंजकर यांचा तो सुपुत्र आहे. या यशासाठी महादजी शिंदे माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, वर्गशिक्षिका सौ. चैताली शेडगे (राऊत), श्री काझी सर, सौ. आशा उंडे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. ऋग्वेदच्या या यशाबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, बाबासाहेब भोस, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय निरीक्षक नवनाथ बोडखे, काकासाहेब वाळुंजकर, कुंडलीकराव दरेकर, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्तात्रय पाचपुते, जिल्हा सचिव पीटर रणसिंग, रामदास ठाकर सर आदी मान्यवरांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## सूर्य कोपला उन्हाची तीव्रता अन शेतकऱ्यांची दमछाक

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात तापमानाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढला असुन पारा ४० अंशांवर पोहोचल्याने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होत आहे.रणरणत्या उन्हामुळे शेतीकामे करताना शेतकऱ्यांची दमछाक होत असून,प्रखर उन्हाचा फटका भाजीपाला आणि फळबागांना बसत आहे.जुन्नर तालुक्यात सध्या कांदा आणि गहू तर उन्हाळी बाजरी देखील काही प्रमाणात काढणी सुरू असून कांदा व गहू काढणी तर उन्हाळी बाजरी काही फुलोऱ्यात,तर काही ठिकाणी कणसांना दाणे लागलेत तर काही काढणीच्या अंतिम टप्प्यात आहे.मात्र,वाढते तापमान आणि मजुरांच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.दुपारी तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत जाते हे जाळणारे तापमान आणि सायंकाळचे ढगाळ वातावरण यामुळे उकाडा वाढला आहे. अवकाळी पावसाच्या भीतीने काढलेले धान्य आणि चारा सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू आहे. अति उष्णतेमुळे घेवडा, कलिंगड,काकडी,टोमॅटो,पालेभाज्या आणि तरकारी याशिवाय आंबा,चिक्कू,डाळिंब,आदिवासी भागातील रानमेवा करपू लागला आहे.नवीन लागवड केलेली रोपे कोमेजल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.पाणी टंचाई आणि वाढत्या उष्णतेमुळे पोषक तत्त्वांच्या शोषणात अडथळा येत असल्यानेपिकांची वाढ खुंटली आहे. याचा थेट परिणाम बाजार पेठेतील पालेभाज्यांच्या दरांवर होत असून भाव वधारले आहेत.

## डॉ. देवयानी आरोटे यांची पुण्यात सुपर स्पेशालिटीसाठी निवड!



■ अहिल्यानगर जिल्ह्याची पहिली महिला कार्डिओलॉजिस्ट

अकोले (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्हा व अकोले तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरत, डॉ. देवयानी विजय आरोटे (एमबीबीएस, एमडी जनरल मेडिसिन) यांची जिल्ह्यातील पहिली महिला कार्डिओलॉजिस्ट म्हणून पुणे येथे सुपर स्पेशालिटी शिक्षणासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लहानपणापासूनच हृदयरोग विषयाची विशेष आवड असल्याने डॉ. देवयानी यांनी कार्डिओलॉजी क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याचे ध्येय ठेवले होते. सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी हे स्वप्न साकार केले आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण अहिल्यानगर येथील वर्का इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झाले, तर माध्यमिक शिक्षण रेसिडेन्शियल कॉलेजमध्ये पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल फाउंडेशनमधून एमबीबीएस पदवी संपादन केली. पुढे धुळे येथील वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी (जनरल मेडिसिन) पूर्ण करून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात भक्कम पायाभरणी केली. डॉ. देवयानी यांच्या यशामागे त्यांचे वडील विजय आरोटे (मुख्याध्यापक, जानकीबाई आपटे मूकबधिर माध्यमिक विद्यालय, अहिल्यानगर) तसेच संपूर्ण आरोटे कुटुंबाचा मोलाचा पाठिंबा लाभला आहे. त्यांचे हे यश केवळ वैयक्तिक न राहता, ग्रामीण भागातील मुलींसाठी उच्च शिक्षणाची प्रेरणा ठरणारे आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे अकोले तालुका व अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव उंचावले असून, विविध स्तरांतून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# झाडे लावा, पृथ्वी वाचवाचा संदेश देत वसुंधरादिन उत्साहात

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)







चाईल्ड फंड इंडिया संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेब बोरा आणे माळशेज हायस्कूल,मढ येथे जागतिक वसुंधरा दिवस अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यासाठी विविधउपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात गावामध्ये काढण्यात आलेल्या प्रभात फेरीने झाली. "झाडे लावा, पृथ्वी वाचवा","पाणी वाचवा, जीवन वाचवा"अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह व पर्यावरणा बद्दलची जागरूकता ही सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. लावलेले प्रत्येक रोप हे भविष्यातील हिरव्या पृथ्वीचे स्वप्न असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. तसेच पर्यावरण संवर्धन,जलसंधारण व स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध व्याख्येते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी विद्यार्थ्यांना "आमची शक्ती आमची पृथ्वी" या जागतिक संकल्पने नुसार मार्गदर्शन केले पृथ्वी आपली आई आहे,तिचे संरक्षण व जतन करणे ही आपली जबाबदारी आहे" असा भावनिक संदेश दिला. त्यासाठी बदलत्या पर्यावरणाचे अभ्यास करून जीवाष्म इंधनावरील अवलंबित्व कमी करून हवामान बदलाचा सामना करणे आणि अक्षय ऊर्जा म्हणजे सौर ऊर्जा व पवन ऊर्जा यांचा उत्पादन व वापर तिप्पट करणे. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून पृथ्वीचे सौंदर्य, पर्यावरणाची हानी आणि त्याचे संरक्षण यांचे सुंदर चित्रांद्वारे प्रभावी चित्रण केले.प्रत्येक चित्रातून निसर्गाविषयीचे प्रेम आणि जपण्याची भावना स्पष्टपणे दिसून येत होती.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन चाईल्ड फंड इंडिया,मढ येथील सिनियर फील्ड ऑफिसर अभिजित मदने यांनी केले.कार्यक्रमाचे एकूण व्यवस्थापन प्रोजेक्ट को- ऑर्डिनेटर मुक्ता गिरी,अजित सोर,प्रवीण जगताप व ज्योती शिवमोरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष मोढवे यांनी प्रभावीपणे केले. बक्षीस वितरण मुख्याध्यापक संजय राणे, रविंद्र भोर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे चित्रीकरण मिथून मोजाड यांनी केले,कार्यक्रमाच्या शेवटी विश्वास गालफडे यांनी आभार प्रदर्शन केले.हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेच्या कविता घोलप,दिपाली जगताप,योगेश मस्करे व रोहन शेळके तसेच शाळेतील सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी मनापासून सहकार्य केले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणा बद्दल प्रेम,जाणीव आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली.

## टोकण यंत्रासाठीही ९०% अनुदान; शेतकऱ्यांना दिलासा

ठाणे : (स. गांवकरी)


■ जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत भात व हिरवळीच्या खताच्या बियाण्यास अनुदान

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत कृषि विभागामार्फत सन २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांच्या माध्यमातून मोठा दिलासा देण्यात येत आहे. भात पिकाचे उत्पादन वाढविणे, जमिनीची सुपिकता सुधारणा करणे तसेच मजूर टंचाईवर मात करण्याच्या उद्देशाने सुधारित भात बियाण्यास ५० टक्के व हिरवळीच्या खताच्या बियाण्यास ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना तूर व भात पिकासाठी कर्जत-३, कर्जत-७, जया, रत्नागिरी-८ तसेच एमटीयू-१०१० या सुधारित व अधिक उत्पादनक्षम जातींचे बियाणे ५० टक्के अनुदानावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. या जाती हवामानास अनुकूल असून चांगले उत्पादन देणाऱ्या असल्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जमिनीची सुपिकता टिकवून ठेवण्यासाठी आणि सेंद्रिय घटकांची वाढ करण्यासाठी धैंचा या हिरवळीच्या खताचे बियाणे प्रति शेतकरी प्रति एकर २० किलो प्रमाणात ९० टक्के अनुदानावर देण्यात येणार आहे.

धैंचा पिकामुळे जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढून पुढील पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण होते. या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित पंचायत समितीच्या कृषि विभागाकडे तात्काळ नाव नोंदणी करावी. अर्जासोबत ७/१२ किंवा ८-अ उतारा, आधार कार्ड तसेच आधारसंलग्न बँक पासबुक यांच्या छायांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील. दरम्यान, शेतीमधील वाढत्या मजूर टंचाईचा विचार करून भात पिकाची टोकण यंत्राद्वारे (Dibbler) पेरणी करण्यासाठी यावर्षीपासून ९० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. SRT पद्धतीने भात लागवड करण्यासाठी किमान ५ टोकण यंत्रांची आवश्यकता असते.

## संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयाला १२ व्हीलचेअरचे दान!

### *कणिसे कुटुंबीयांचा समाजाभिमुख उपक्रम*



छत्रपती संभाजीनगर :(स. गांवकरी)

छत्रपती संभाजीनगर शहरात सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत कणिसे कुटुंबीयांनी एक स्तुत्य व प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे. स्वर्गीय श्री धनराज कणिसे व श्री कन्हैया कणिसे यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व घाटी रुग्णालय येथे १२ व्हीलचेअरचे दान करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन शिवसेनेचे तालुकाध्यक्ष किसन कणिसे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रम अत्यंत साध्या पण भावपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कणिसे कुटुंबीयांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे मत व्यक्त केले. या प्रसंगी नगरसेवक सिद्धांत शिरसाठ, माजी नगरसेवक अशोक सायना, भाजप कार्यकर्ता विशाल दाभाडे, शिवसेना नेते बाबा तायडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत रुग्णसेवेसाठी हे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. घाटी रुग्णालय हे मराठवाड्यातील एक प्रमुख व मोठे शासकीय रुग्णालय असून येथे दररोज हजारो रुग्ण उपचारासाठी येत असतात. अनेकदा वृद्ध, दिव्यांग किंवा गंभीर अवस्थेतील रुग्णांना हालचालीसाठी व्हीलचेअरची आवश्यकता भासते. अशा परिस्थितीत कणिसे कुटुंबीयांनी दिलेल्या १२ व्हीलचेअरमुळे रुग्णालय प्रशासनाला मोठा दिलासा मिळणार असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय कमी होणार आहे. यावेळी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, अशा प्रकारचे उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवून आणतात. समाजातील इतर सक्षम व्यक्तींनी व संस्थांनीही पुढे येऊन आरोग्यसेवा क्षेत्रात योगदान देण्याची गरज आहे.

एकंदरीत, कणिसे कुटुंबीयांनी स्वकीयांच्या स्मृती जपत केलेले हे कार्य समाजासाठी आदर्श ठरत असून, सामाजिक जबाबदारीची जाणीव जपणारा हा उपक्रम सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे.

## जनगणना प्रशिक्षणाचे उद्घाटन; अचूक माहिती संकलनावर भर




श्रीगोंदा: (स. गांवकरी)

राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा तालुक्यात जनगणना प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय येथे आयोजित या कार्यक्रमात प्रगणक व पर्यवेक्षकांना माहिती संकलनाच्या विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी सांगितले की, जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक नागरिकाची अचूक माहिती नोंदवणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणाद्वारे प्रगणकांना घरांची माहिती, कुटुंबीयांची नोंद तसेच डिजिटल पद्धतीने माहिती संकलन करण्याबाबत मार्गदर्शन दिले जात आहे. तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागांसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले असून प्रत्येक प्रगणकावर ठराविक घरांची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास श्रीगोंदा नगरपालिका मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत तसेच महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य साळवे उपस्थित होते. जनतेने जनगणना मोहिमेत सहकार्य करून अचूक माहिती द्यावी, असे आवाहन तहसीलदारांनी केले. प्रशिक्षणानंतर लवकरच प्रत्यक्ष जनगणना प्रक्रिया सुरू होणार असून या मोहिमेमुळे तालुक्याच्या विकासासाठी आवश्यक असा महत्त्वपूर्ण डेटा उपलब्ध होणार आहे.

# अग्रीपंख फाउंडेशनचा उपक्रम कौतुकास्पद – आनंद भंडारी

श्रीगोंदा : (स. गांवकरी)




स्व. अजित पवार यांच्या नेतृत्वात विकासाचा ध्यास आणि सामान्य माणसांच्या समस्यांची जाणीव होती. त्यांना श्रद्धांजली म्हणून अग्रीपंख फाउंडेशनने राबविलेला 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले. भविष्यात मुलांमध्ये दातृत्वाची भावना निर्माण करण्यासाठी आणि वंचितांना आधार देण्यासाठी हा उपक्रम शाळांमध्ये दरवर्षी राबविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. अग्रीपंख फाउंडेशनतर्फे गुरुवारी 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' या उपक्रमात सहभागी झालेल्या ७२ शाळांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी भंडारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब वाघ होते.

या प्रसंगी सहभागी सर्व शाळांना उपयुक्त भेटवस्तू देण्यात आल्या, तर दहा शाळांना सन्मानपत्र तसेच प्रत्येकी एक सायकल देऊन गौरविण्यात आले. भंडारी पुढे म्हणाले की, शाळा, विद्यार्थी, खेळाडू आणि भारतीय जवान यांना प्रोत्साहन देण्याची अग्रीपंखची भूमिका उल्लेखनीय आहे. सोशल मीडियाचा अतिरेक कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होणे गरजेचे असून, प्रत्येक शाळेत वाचनालय उभारले पाहिजे.

प्राथमिक विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी सांगितले की, अग्रीपंख फाउंडेशन सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शाळांना आधार देत चांगले कार्य करीत आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनीही उपक्रमाचे कौतुक करत अशा कामांची समाजाला गरज असल्याचे सांगितले.

यावेळी उद्योजक संजयकुमार मचे, प्रविण शिंदे, रामदास झेंडे, डी. डी. भुजबळ, विकास पाटील, आबासाहेब जगताप आदींनीही मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अग्रीपंख फाउंडेशनचे विश्वस्त दिलीपराव काटे यांनी केले.

कार्यक्रमाला तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, संदीप सोमवंशी, किसन वऱ्हाडे, एन. टी. शेलार, अंकुश घाडगे, गोपाळराव डांगे, भावना मोहीते आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाल चव्हाण यांनी केले, तर आभार राजकुमार इथापे यांनी मानले.

**वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय - बीयू.५ए एसएफएस फ्लॅट्स, इन्कम टॅक्स कॉलनी जवळ, आउटर रिंग रोड, पीतमपुरा, दिल्ली ११००३४**

**CIN- U42201DL2025GOI450109**

**सार्वजनिक सूचना**
**वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडच्या**
**पारेषण परवाना मंजुरी अर्जावर (प्रकरण क्र. ६२/२०२६) सूचना/हरकती आमंत्रित**

१. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड पारेषण मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे परवाना आधी महाराष्ट्र वीज नियामक कमिशन खाली विद्युत कायदा, २००३ च्या कलम १४ आणि १५ आणि एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियम, २००४ च्या तरतुदींनुसार. माननीय आयोगाने २२ एप्रिल २०२६ रोजी अर्ज दाखल करून घेतला आहे आणि वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडला विद्युत कायदा, २००३ च्या कलम १५(२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.
२. नवीकरणीय ऊर्जा (RE) विजेच्या वहनातील अडथळे दूर करण्यासाठी आणि वहन क्षमता वाढवण्यासाठी, वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना आंतर–राज्यीय पारेषण प्रणाली मजबूत करण्याकरिता एक विशेष उद्देश वाहन (विशेष उद्देश वाहन) म्हणून करण्यात आली आहे. याअंतर्गत ४००/२०० केव्ही एआयएस वागदारी (जि. सोलापूर) तसेच अनेक सर्किट्सवर संबंधित लाईन्स आणि बेजची व्यवस्था स्थापित केली जाईल . प्रकल्प आहे झाले पुरस्कार प्रदान केला माध्यमातून दर महाराष्ट्र शासनाने निविदा प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडद्वारे आयोजित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया.
३. प्रकल्पात खालील बाबींचा समावेश आहे

| अ. क्र. | पारेषण योजनेची व्याप्ती | प्रभावी तारखेपासून नियोजित COD | प्रकल्पाच्या घटकाच्या नियोजित COD वर वसूल करण्यायोग्य उद्धृत पारेषण शुल्काची टक्केवारी | संबंधित घटकाच्या व्यावसायिक कार्यान्वयनाची (सीओडी) घोषणा करण्यासाठी पूर्व. आवश्यक असलेले घटक |
|---|---|---|---|---|
| १. | ३X५०० MVA, ४००/२२० kV ICT आणि ४०० kV पातळीवर १X१२५ MVAr बस रिॲक्टरसह AIS वागदारीची स्थापना.<br>• ४०० / २०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी - ०३ नग.<br>• १२५ MVAr, ४०० kV बस अणुभट्टी – १ क्र<br>• ४०० केव्ही लाईन बे - ०४ नग.<br>• ४०० केव्ही आयसीटी बे - ०३ नग<br>• ४०० केव्ही बस रिॲक्टर बे– ०१ नं.<br>• २२० केव्ही लाईन बे – ०४ नग.<br>• २२० केव्ही आयसीटी बे – ०३ नग.<br>**भविष्यातील अवकाश तरतुदी -**<br>• १X५०० एमव्हीए ४००/२२० केव्ही आयसीटीची स्थापना<br>• ४००/२०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी – ०१ नं.<br>• ४०० केव्ही आयसीटी बे – ०१ नं.<br>• २२०केव्ही आयसीटी बे – ०१ नं. | एसपीव्ही हस्तांतरणापासून २४ महिने | १००% | योजनेच्या सर्व घटकांचे एकाच वेळी कार्यान्वयन करणे आवश्यक आहे, कारण त्यांचा वापर एकमेकांच्या कार्यान्वयनावर अवलंबून आहे. |
| २. | ४०० केव्ही एआयएस वागदरी (नवीन) ते ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन (प्रस्तावित)<br>• ४०० केव्ही, ६३ एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ४०० kV AIS वागदारी–०२ Nos वर<br>• ४०० केव्ही, ५० एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) येथे (प्रस्तावित) – ०२ नग<br>• ७६५ केव्ही एआयएस वर ४०० केव्ही एआयएस लाइन बे पुणे (पूर्व) (प्रस्तावित) – ०२ नग | | | |
| ३. | ४०० केव्ही एआयएस वागदरी (नवीन) पासून ४०० केव्ही सोलापूर पूलिंग स्टेशन (सेक्टर–०२) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन<br>• ४०० केव्ही सोलापूर येथील ४०० केव्ही लाईन बे पूलिंग स्टेशन (सेक्टर–२) – ०२ नग | | | |
| ४. | ४०० kV AIS वागदारी (नवीन) पासून २२० kV AIS वागदारी (प्रस्तावित) पर्यंत २२० kV D/C लाइन<br>• २२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस वागदारी (प्रस्तावित) – ०२ नग | | | |
| ५. | ४०० केव्ही एआयएस वागदारी येथे सौर जनित्रांसाठी ४०० केव्ही लाईन बेची स्थापना.<br>• ४०० केव्ही लाईन बे – ०४ नग | | | |
| ६. | वागदारी येथील ४०० केव्ही एआयएस येथे सौर जनित्रांसाठी २२० केव्ही लाईन बेची स्थापना.<br>• २२० केव्ही लाईन बे – ०४ नग | | | |
| ७. | ४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) पासून २२० केव्ही एआयएस नारंगवाडी (विद्यमान) पर्यंत २२० केव्ही डी/सी लाईन.<br>• २२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस नारंगवाडी (विद्यमान) – ०२ नग | | | |

४. टॅरिफ आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) प्रक्रियेनुसार यशस्वी बोलीदाराने अर्जदाराचे अधिग्रहण केले असून, महाराष्ट्र राज्यात सदर आंतर–राज्य पारेषण प्रणालीची स्थापना, संचालन आणि देखभालीसाठी पारेषण परवाना मिळवणे आवश्यक आहे. त्यानुसार, वागदारी पॉवर ट्रान्समिशन लि. ने पारेषण परवाना मिळवण्यासाठी माननीय आयोगासमोर ही याचिका दाखल केली आहे.
५. कमिशन आहे दिग्दर्शित वागदारी संसर्ग मर्यादित प्रसारण परवानगीसाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना/आक्षेप मागवणे परवाना माध्यमातून हे सूचना. संपर्क तपशील च्या नोडल व्यक्ती ज्यांच्याकडून अर्जाची प्रत तपासणी किंवा खरेदीसाठी मिळवता येईल, त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:
a. **नाव** : श्री. विनोद कुमार
b. **अर्जाची प्रत पाहणी किंवा खरेदीसाठी मळिवण्याचा पत्ता** : केसीसी बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड, ८ मजला, टॉवर–ए, एम३एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१
c. **तपासणी किंवा खरेदीची वेळ**: कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी १७:०० च्या दरम्यान
d. सविस्तर अर्ज कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) ₹१००/- रोख किंवा DD / चेकद्वारे भरल्यावर CD सोबत वागदारी ट्रान्समिशन "मर्यादित" देय रक्कम नवी दिल्ली येथे देय आहे.
e. ज्या वेबसाईटवरून अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करता येईल, त्या वेबसाईटचा पत्ता : https://kccbuildcon.co.in/
६. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून, ज्या कोणालाही सूचना/आक्षेप नोंदवायचे आहेत, ते इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात अपलोड करून सादर करू शकतात. 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' MERC वेबसाइटवरील टॅब ( www.merc.gov.in/e-public-consultation). हे वैशिष्ट्य वापरण्यात काही अडचण आल्यास, संबंधित हितधारकांनी संपर्क साधावा . कॅन संपर्क मर्क कार्यालय वर मोबाईल क्रमांक : ८९२८०७१५२२ किंवा वर ईमेल आयडी: सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० च्या दरम्यान suggestions@merc.gov.in वर पाठवा .
७. ज्या व्यक्तीने सूचना आणि आक्षेप अपलोड केले आहेत 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' टॅबने त्याच्या सबमिशनची कोणतीही हार्ड कॉपी दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीकडे इलेक्ट्रॉनिक सुविधा नाही माध्यमे कॅन फाइल त्यांचे सूचना आणि आक्षेप मध्ये अ कठीण प्रत यांना उद्देशून **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), १३ वा मजला, सेंटर नं. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४००००५, सोबत श्री. डी. के. वालेचा, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., (सीओओ, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., ८ वा मजला, टॉवर-ए, एम3एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१, ईमेल: dkvalecha@kccbuildcon.co.in )** यांच्यावर नोटीस बजावल्याचा पुरावा. पाहिजे वाहून नेणे प्रेषकाचे पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ईमेल पत्ता (असल्यास). यानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि / किंवा आक्षेप **१७:०० वाजता २५ मे २०२६ रोजी** विचारात घेतले जाणार नाही. इतर कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.
८. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड प्रत्येक आक्षेपाला/टिप्पणीला उत्तर देईल. तीन दिवसांच्या आत मिळाले च्या त्याची पावती पण नाही नंतर पेक्षा **२८ मे २०२६ २५ मे २०२६** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांसाठी/टिप्पण्यांसाठी .

**ठिकाण : दिल्ली**
**दिनांक : २५.०४.२०२६**

**एसडी /-**
**देवेंद्र कुमार वालेचा,**
**सीओओ (प्रशिक्षण आणि विकास)**